| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| १ | "भायखळा, मुंबई येथील आर्थर रोड कारगृहामधील वॉर्डन मंजुळा गोविंद शेटये यांना दोन अंडी व पाच पावांचा हिशेब लागत नसल्यामुळे कारागृह अधिक्षक आणि महिला पोलीस कर्मचा-यांनी त्यांना दोन टप्प्यात मारहाण तसेच लौंगिक अत्याचार केल्यामुळे त्यांचा मृत्यु झाल्याचे माहे जून,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, तिच्या गळया भोवती साडीचा फास लावून बॅरेक क्र.१ मधून बॅरेक क्र.५ पर्यंत विवस्त्र अवस्थेत सर्व कैद्यांसमोर लाठया काठयांनी केलेली मारहाण, तिला वाचविण्यासाठी काही महिला कैदी गेले असता तुमचेही असेच हाल करण्यात येईल अशी धमकी कारागृह अधिक्षक आणि महिला पोलीस कर्मचा-यांनी देणे, या कारागृहातील इतर महिला कैद्यांसह काही महिला पोलीस अधिकारी व कर्मचा-यांवरही वरिष्ठ अधिका-यांकडून लैंगीक अत्याचार होत असल्याचेही निर्देशनास येणे, या संपूर्ण प्रकारामुळे महिला कैद्यांमध्ये पसरलेले भितीचे वातारण, त्यामुळे मंजुळा शेटये यांच्या मृत्युची चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | **गृह विभाग** |
| 2 | "नागपूर जिल्हयातील १० पैकी ८ मुलांचा कळमेश्वर जवळील वेणा जलाशयात बुडून मृत्यु झाल्याची दि. ९ जूलै, २०१७ रोजी घडलेली घटना, मुलांनी नावेमध्ये मौजमस्ती तसेच सेल्फी व | **गृह विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | व्हिडीओ शुटींग करीत असतांना नावेचे संतुलन बिघडल्याने जलाशयाचे पाणी नावेमध्ये शिरुन नाव बुडणे, तसेच मुंबईतील जूहू, गोराई, वरळी, दादर, गिरगाव चौपाटी, आक्सा, मढ, मरिन लाईन्ससह पावसाळयात समुद्राच्या लाटांची मजा लुटण्यासाठी पर्यटकांची गर्दी समुद्र किनाऱ्यावर वाढत असणे, विलेपार्ले येथील दोन विद्‌यार्थ्यांचा जुहू येथील समुद्र किनारी लाटेचा अंदाज न आल्यामुळे झालेला मृत्यु, तसेच मरिन लाईन्स येथे सेल्फी घेताना एका विदयार्थिनीचा बुडून झालेला मृत्यु, मुंबईतील समुद्र किनारे,चौपाटयांवर नो सेल्फी झोन म्हणून घोषीत करुन तसेच पोलीस व जीवरक्षकांकडून पर्यटकांना वारंवार धोक्याच्या सूचना देऊनही त्याकडे पर्यटकांनी केलेले दुर्लक्ष, त्यामुळे अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया." | |
| **3** | " माळीण (ता.आंबेगाव जि.पुणे) या गावामध्ये दिनांक ३० जुलै, २०१४ रोजी डोंगरकडा कोसळून झालेल्या दुर्घटनेत १५१ जणांचा झालेला मृत्यु, तद्‌नंतर राज्य शासनाने माळीण गावापासून जवळच आमडे गावाच्या हद्दीत तेथील नागरिकांचे पुनर्वसन करुन माहे एप्रिल, २०१७ मध्ये सर्व सुविधांनी सज्ज असलेल्या पुनर्वसित माळीण गावाचे मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण करणे, | **महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | नवीन बांधलेल्या घरांच्या भिंतीना तडे जाऊन रस्त्याला पडलेल्या भेगा, ड्रेनेजलाईन उखडून सांडपाणी वाहणारी गटारे तुंबून ग्रामस्थांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, घरांच्या भिंती बरोबरच शाळेच्या मागील मातीचा भराव वाहून गेल्याने शाळेला निर्माण झालेला धोका, माळीण गावाचे पुनर्वसन होऊन अवघे चार महिने झाले नाहीत तोच येथे झालेल्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने ग्रामस्थांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया." | |
| **4** | "परभणी जिल्हयातील आंध्रा बँक, युको बँक युनायटेड बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, सिंडीकेट बँक या पाच राष्ट्रीयकृत बँका व रत्नाकर बँक या खाजगी बँकेच्या अधिका-यांशी संगनमत करून गंगाखेड शुगर अँण्ड एनर्जी लि. कारखान्याच्या संचलक मंडळाने हजारो शेतक-यांच्या नावावर तब्बल ३२८ कोटींचे कर्ज उचलेले असल्याचे माहे जुलै २०१७ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे या शेतक-यांना दुस-या कोणत्याही बँकांचे कर्ज मिळत नसणे, तसेच सदर कर्ज देताना या कर्जदारांनाकडून रिझर्व बँकेच्या नियमानुसार केवायसीची पूर्तता केलेली नसून गंगाखेड शुगर ने पुरवलेल्या कागदपत्रांच्या आधारेच कर्ज दिलेली असणे, या एकाही प्रकरणात २० टक्के मार्जिन मनी घेतली गेलेली नसून कर्जदारांने कोणत्याही प्रकारचा कर्ज मागणी अर्ज दिलेला नसणे, तसेच | **सहकार पणन व वस्त्रौद्योग (सहकार) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | कर्ज दिल्यावर ते आधी खातेदार शेतक-यांच्या बचत खात्यात जमा केले गेले व त्यानंतर तत्काळ खातेदाराच्या परवानगी शिवाय गंगाखेड शुगरच्या खात्यात वळते केले, त्यामुळे अशाप्रकारे परभणी जिल्हयातील हजारो शेतक-यांची खोटी कागदपत्रे सादर करून त्यांची फसवणूक करण्याच्या गंगाखेड शुगर व एनर्जी लि. या खारखान्याच्या संचालकांवर तसेच संबंधित बँकांच्या अधिका-यांवर फौजदारी कारवाई करण्यासाठी व फसवणूक झालेल्या शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **5** | "अकरावी प्रवेशप्रक्रिया राबविण्याऱ्या नाएसा कंपनीच्या निष्काळजीपणामुळे प्रवेशाची यादी पाहण्यासाठी मुंबईसह राज्यातील अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना दि. १० जुलै, २०१७ रोजीची रात्र जागून काढावी लागणे, सायंकाळी पाच वाजता जाहीर होणारी यादी, मुंबईत मध्यरात्र उलटून गेल्यानंतर रात्रौ एक वाजता जाहीर करणे, रात्रौ यादी जाहीर झाल्यानंतर मंगळवारी दि. ११ जुलै, २०१७ रोजी सकाळपासूनच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जाऊन प्रवेश घेण्यासाठी लावलेल्या रांगा, अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील गोंधळ टाळण्यासाठी, यावर्षी राज्य शासनाने नोयडा नाएसा या कंपनीची केलेली नियुक्ती, सदर कंपनीकडे मुंबईसह राज्यातील इतर जिल्हयांची अकरावी प्रवेशांची सोपविण्यात | **शालेय शिक्षण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | आलेली जबाबदारी, तथापि नोंदणी प्रक्रियेपासूनच अकरावी प्रवेश प्रक्रियेचा सुरु असलेला गोंधळ, त्यामुळे पहिल्या गुणवत्ता यादीकडे सर्व पालकांचे व विद्यार्थ्यांचे लागलेले लक्ष, तथापि कंपनीने यादी अपलोड करण्यास वेळीच सुरुवात न केल्याने संध्याकाळी पाच वाजता जाहीर होणारी यादी, मध्यान्ह रात्रौ जाहीर करणे, यादी जाहीर होऊनही त्याबाबतचे मॅसेज विद्यार्थ्यांना न मिळणे, अनेक तांत्रिक अडचणीमुळे मुंबईतील प्रवेशप्रक्रिया एका दिवसासाठी खंडीत करावी लागणे, परिणामी प्रवेशाचे वेळापत्रक कोलमडणे, दि.१० जुलै, रोजी सायंकाळी पाच वाजल्यापासून संकेतस्थळ बंद असल्याने जागा वाटप यादी पाहण्यासाठी विद्यार्थी व पालकांना प्रतिक्षा करावी लागणे, परिणामी पालकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, प्रवेश प्रक्रिया राबविणाऱ्या कंपनीच्या अनागोंदी कारभारामुळे लोकांना झालेला नाहक त्रास, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| **6** | " राज्यात वस्तु-सेवाकर लागू झाल्यानंतर वाढलेले कर आणि या करआकारणीतील जाचक अटींमुळे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी आणि कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी शहरातील वस्त्रोद्योगापुढे गंभीर संकट उभे राहणे, कापडावर लावण्यात आलेलया ५ टक्के वस्तू सेवा करा विरोधात कापड | **वस्त्रोद्योग विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | व्यवसायीकांनी नोंदविलेला निषेध, कापड उत्पादक यंत्रमागधारकांनी उत्पादन घटविले असून जीएसटी कर प्रणालीतील नियमपध्दती व अटींच्या निषेधार्थ दि.१८ जुलै,२०१७ पासुन लाखो पॉवरलुम कारखाने काही कालावधीसाठी बंद करण्यात आलेले असणे, यामुळे पंधरा ते वीस लाख कामगारांना रोजगारापासुन वंचित रहावे लागत असून कोट्यावधी रुपयांची आर्थिक उलाढाल पूर्णपणे थंडावलेली असणे, वाढत्या करामुळे कोणी कापड विकत घेण्यास तयार नसल्याने विकलेला कापडाचा साठा वाढत चालल्याने विनकरांनी थांबविलेले उत्पादन हीच परिस्थिती राज्याचे मॅचेस्टर म्हणून ओळख असलेल्या इंचलकरंजी (जि.कोल्हापूर) या ठिकाणी असणे, शहरातील कापड उत्पादक, यंत्रमाग धारकांनी उत्पादन घटविले तर दुसरीकडे उत्पादीत कापडांची खरेदी पाच दिवस बंद करण्याचा निर्णय कापड व्यापाऱ्यांनी घेतल्याने दररोज १५० कोटी रु. कापड खरेदी ठप्प होणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई त्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, शासनाने याप्रकरणी वेळीच हस्तक्षेप करून अडचणींत असलेल्या व कोट्यावधी नागरीकांची उपजिवीका अवलंबुन असणा-या पॉवरलुम उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी युध्दस्तरावर उपाययोजना करण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया. | |
| 7 | "विलंबाने दाखल झालेल्या मान्सुनच्या पावसाने | **कृषि व पदुम** |

| | | |
|---|---|---|
| | दडी मारल्यामुळे राज्यात दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट, राज्यात जुलैच्या मध्यापर्यंत सुमारे ४० टक्के क्षेत्रावर झालेल्या पेरण्या, पावसाने ओढ दिल्याने वाया जाण्याचा निर्माण झालेला धोका, परिणामी राज्यातील चिंतातूर झालेला शेतकरी मराठवाड्यातील अनेक तालुक्यात पिके न आल्याने, परभणी, जिंतूर, गंगाखेड तालुक्यात दुबार पेरणीशिवाय शेतकऱ्यांपुढे पर्याय नसणे, मराठवाड्यात ८० टक्के पेरण्या झाल्याची शासनाकडे नोंद असणे, उर्वरित २० टक्क्यांच्या ठिकाणी न झालेल्या पेरण्या आणि पाऊस न झाल्याने खुंटलेली पिकांची वाढ, विदर्भातही पावसाअभावी ठप्प झालेल्या पेरण्या, अमरावती विभागात ५० टक्के क्षेत्रात लागवड होऊनही दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट कायम असणे, नागपूर विभागात केवळ १० टक्केच झालेल्या पेरण्या, पश्चिम महाराष्ट्रात सोलापूरमध्ये ६४ टक्के, कोल्हापूर मध्ये ८० टक्के तर सातारा जिल्ह्यात ७५ टक्क्यापर्यंत पेरण्या झाल्या असल्यातरी पावसाने ओढ दिल्याने धोक्यात आलेल्या पेरण्या, कोकणातील भात शेतीलाही पावसाच्या लहरीपणाचा बसलेला फटका, उत्तर महाराष्ट्रातही नाशिक, धुळे, जळगावमध्ये सलग चौथ्यावर्षी दुष्काळ स्थिती निर्माण झाली असून, पावसाने दडी मारल्याने पिक करपण्यास झालेली सुरुवात, | **(कृषि) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | पिकांची खुंटलेली वाढ, उत्पादन घटण्याची निर्माण झालेली भिती, वाया गेलेले बी-बियाणे, निविष्ठा, दुबार पेरणीसाठी पुन्हा नव्याने करावी लागणारी सुरुवात, याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दि.१७ जुलै, २०१७ रोजी मा.कृषी मंत्री यांना पत्र पाठवून दुबार पेरणी करिता शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत केलेली विनंती, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया." | |
| **8** | "मुंबई उपनगरे, ठाणे, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर या ठिकाणच्या रिक्षा चालकांची सुरु असलेली मनमानी, कापूरबावडी, ठाणे येथे रिक्षावाल्याकडून विनयभंगापासून बचाव करण्यासाठी एका तरुणीने रिक्षातून मारलेली उडी, तसेच रिक्षात बसलेल्या दोन मुलींनी रिक्षाचालकाने अश्लील हावभाव केल्याने घाबरुन मारलेली उडी, जवळचे भाडे नाकारणे, प्रवाशासोबत उध्दट वर्तन करणे, मनमानी भाडे आकारणे, अशाप्रकारे वेगवेगळ्या मार्गांनी रिक्षाचालकांची सुरु असलेली मनमानीचा त्रास प्रवाशांना विशेषत: महिला प्रवाशांना बसत असून त्यावर वाहतूक शाखा तसेच पोलीस यंत्रणेचे कोणतेही नियंत्रण नसणे, परिणामी सर्वसामान्य प्रवाशांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया " | **परिवहन विभाग** |
| 9 | "मुंबईसह राज्यात साथीच्या आजारांचे एकूण १७९० रुग्ण आढळून येणे, त्यातच स्वाईन | **सार्वजनिक** |

| | | |
|---|---|---|
| | पल्युच्या रुग्णांतही लक्षणीय वाढ होत असून माहे जुन, २०१७ मध्ये तब्बल ३१३ जणांना स्वाईन पल्यूची झालेली बाधा, उपचारार्थ दवाखाने, पालिका, सरकारी रुग्णालये तसेच खाजगी रुग्णालयात रुग्णांची वाढलेली गर्दी, वातावरणातील बदलामुळे स्वाईन पल्युच्या रुग्णांची संख्याही मोठया प्रमाणत वाढत चाललेली असतांना दूसरीकडे दुषित पाण्यामुळे गॅस्ट्रोची वाढलेली साथ, माहे जून, २०१७ मध्ये मुंबईत मलेरियाचे ४४२, लेप्टोचे, २० डेंग्यू ३१ एच १ एच १ (स्वाईन पल्यू) ३१३, गॅस्ट्रो, ८८६ तर हेपेटायटिसचे ९८ रुग्ण आढळून येणे, मुंबईसह राज्यात अन्य ठिकाणी स्वाईन पल्यूचा तसेच विविधी साथीच्या प्रादुर्भाव वाढत असून त्याकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी वाढत चाललेल्या साथीच्या आजारांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | **आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग** |
| 10 | "मुंबई विद्रयापीठ ३१ जूलै, २०१७ निकालाची डेडलाईन पाळणार असे सांगत असणे, परंतु अजूनही अनेक विषयांचे मॉडरेशनच झाले नसल्याने निकालाला उशीर होणार असे प्राध्यापकांचे म्हणणे असणे, इंजीनिअरीगच्या उत्तरपत्रिका ऑनलाईन पध्दतीने तपासल्या जातात त्याचप्रमाणे विदयापीठाच्या सर्व परीक्षांच्या | **उच्च व तंत्रशिक्षण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | उत्तरपत्रिका ऑनलाईन तपासल्या जातील असा निर्णय कुलगुरू यांनी घेतांना प्राध्यापकांशी चर्चा न करणे, ऑनलाईन तपासणीला लागणा-या वेळेमुळे लाखो विदयार्थ्यांचे होत असलेले नुकसान, याबाबत मा. राज्यपालांनी कुलगुरूंना तात्काळ निकाल लावण्याचे आदेश देवूनही त्याची न झालेली अंमलबजावणी, अनेक अभ्यासक्रमाचे मॉडरेशनच सुरू झालेले नसल्यामुळे लाखो उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करण्यासाठी कमीत कमी २० दिवस लागणार असल्यामुळे ३१ जूलै, २०१७ च्या मुदतीपूर्वी हे पेपर तपासण्याची शक्यता फारच कमी असल्याचे प्राध्यापकांनी स्पष्ट केलेले असणे, परिणामी विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश घेण्यास निर्माण झालेल्या अडचणी परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष लक्षात घेता मुंबई विदयापीठाचा निकाल लवकरात लवकर लावण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| 11 | "राज्यातील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात श्वान दंशाच्या लसीचा मोठयाप्रमाणात तुटवडा असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, सन २०१६-१७ मध्ये आरोग्य विभागाने केंद्रीय स्तरावर श्वान दंशावरील लसीची खरेदी न केल्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, सध्या | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंग कल्याण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिक पातळीवर ही लस १३७ रुपये प्रतिवायल या दराने शासनाकडून खरेदी करण्यात येत असून भारत बायोटेक ही कंपनी हीच लस १२६ रुपये प्रतिवायल दराने देण्यास तयार असताना सुध्दा ही लस त्या कंपनीकडून घेण्यात न येणे, त्यामुळे शासनाचे होत असलेले लाखो रुपयांचे नुकसान, राज्यात सुमारे अडीच लाख व्यक्तींना कुत्रे चावले असल्याच्या घटना घडत असतांना त्यासाठी १२ लाख वायल दरवर्षी खरेदी करण्यात येत असणे, परंतु स्थानिक पातळीवर प्रतिवायल १३७ रुपये दराने खरेदी करण्यात येत असून शासनाचे नुकसान टाळण्यासाठी निविदा मागवून या लसीची खरेदी करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | |
| 12 | "कल्याण (जि.ठाणे) येथील नेवाळी, चिंचवली, खोणी, भाल, द्वारली, वसार, मनोरा, तिसगांव, आडिवली, वडवली, धामटन या गावातील शेतक-यांची सुमारे १६८४ एकर जमीन नौदलाने विमानतळासाठी संपादीत करणे, जमिनीच्या सातबाऱ्यावर शेतकऱ्यांची नावे असून ही जागा संरक्षण विभागाने भाडेतत्वार घेतल्याची कागदपत्रे शेतकऱ्यांकडे असणे, सदर जमिनीवर संरक्षण विभागाने अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्याने ही जमिन परत मिळावी यासाठी शेतकऱ्यांनी केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडे तसेच शासनाकडे वारंवार | **सामान्य प्रशासन विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही न करणे, सदर जमिनीवर भूमाफियांनी व विकासकांनी अनधिकृतपणे इमारती व चाळी बांधून विकणे, नौदलाने जमिनीवर होणारी अतिक्रमणे रोखण्यासाठी संपादित केलेल्या जमिनी भोवती संरक्षक भिंत टाकण्याचे काम सुरु केल्याने त्याच्या निषेधार्त शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनावर पोलीसांनी लाठीमार करुन पॅलेटनगचा वापर केल्याने अनेक शेतकरी जखमी होणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया." | |
| 13 | "राज्यभरातील विविध पेट्रोलपंपावर सुरू असलेल्या पेट्रोलचोरीची चौकशी करीत असतांना ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने या प्रकरणाचा सूत्रधार प्रकाश नुलकर याला माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केलेली अटक, पेट्रोलपंपावरील “डिस्पेन्सिंग युनिट” मध्ये इलेट्रानिक्स चिप्सच्या सहायाने पेट्रोल चोरी होत असल्याचे निदर्शनास येणे, पेट्रोलपंपाच्या “डिस्पेन्सिग युनिट”च्या सॉफटवेअरमध्ये फेरफार करण्यासाठी लागणा-या “इलेट्रानिक्स् चिप्स” चीनमधून आयात करुन चिप्समध्ये नवीन प्रोग्राम लोड करुन आरोपीने चीन, अबुधाबी आणि दक्षिण आफ्रिकेतही विक्री केल्याची केल्याची माहिती ठाणे पोलिस आयुक्त यांनी पत्रकार परीषदेमध्ये दिली | **गृह विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | असणे, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशसह इतर राज्यांमध्येही हा गैरव्यवहार होत असल्याची शक्यता पोलिस आयुक्त यांनी वर्तविणे, वैधमापनशास्त्र विभागासह पेट्रोलियम कंपन्यांचे कर्मचारीही सदर घोटाळयात असण्याची शक्यता असून पंपांना डिस्पेन्सिंग युनिटचा पुरवठा करणारेही यामध्ये सहभागी असण्याची शक्यता असणे, राज्यातील १६ जिल्हयांमधील एकुण ९६ पेट्रोलपंपांची आतापर्यंत तपासणी करण्यात आली असून यापैकी ५६ पंपांवर पेट्रोलचोरी होत असल्याचे आढळून आले असून अत्तापर्यंत एकुण २३ जणांना अटक करण्यात आली असणे, सदर गैरप्रकारामुळे सामान्य नागरिकांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | |
| 14 | "मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून मोठया प्रमाणात आंतरराष्ट्रीय पर्यटक येत असतांना शहरातील रस्त्यांची झालेली दयनिय अवस्था, सन २००४ ते २००१२-१३ या कालावधीत मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये शहरातील रस्त्यांसाठी १४ हजार २९२ कोटी रुपयांची तरतूद केली असता फक्त ५ हजार ३०६ कोटी रुपयेच रस्त्यांवर खर्च केलेला असणे, दरवर्षीच्या पावसाळयामध्ये मुंबई शहरातील रस्त्यांवर मोठया प्रमाणात खड्डे पडत असल्यामुळे होत असलेली | **नगर विकास विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | वाहतूक कोंडी, वाहनांचे नुकसान होत असून वाहनचालकांना पाठीचा व मानेचा त्रास होण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, मुंबई शहरामध्ये वर्षभर घरगुती गॅस पाईप लाईन, वीज लाईन तसेच मोबाईल ४ जी च्या लाईन टाकण्यासाठी रस्त्यांचे खोदकाम केले जातात परंतु सदर लाईन्स् टाकुन झाल्यावर नियमांप्रमाणे परत रस्त्यांचे पुर्नदुरुस्ती करण्यात न येणे, मुंबई शहरामध्ये युटीलीटी कॉरीडोर नसणे, शहरातील रस्त्यांची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्यामुळे सदर रस्त्यांच्या निमिर्तीसाठी मोठया कंपन्यांचा सहभाग नसणे, तसेच मुंबईतील रस्त्याच्या कामामध्ये मोठया प्रमाणात घोटाळा झाल्याचे निष्पन्न् होणे, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत मा. महापौर यांनी महापालिका आयुक्त यांना निवेदन देणे, रस्त्याचे काम करणा-या ठेकेदारांना काळया यादीत टाकणे, काठया यादीत टाकलेल्या ठेकेदारांना पुन्हा मोठया प्रमाणात महापालिकेचे मोठया रकमेचे ठेके देणे, ठेकेदारांच्या कर्मचा-यांना पोलिसांनी अटक करणे, तसेच महापालिकेच्या लेखापरीक्षकांनाही अटक करणे, सदर विषयामध्ये शासनाने मध्यस्थी करून मुंबई शहराला चांगले आंतरराष्ट्रीय दर्जाचे रस्ते मिळण्याबाबत राज्य शासनाने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | |
| 15 | "देशभरात वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झाला आणि पालिकेला आपला जकार कर बंद | **नगरविकास विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | करावा लागणे, मुंबई महानगरपालिका देशातील सर्वात श्रीमंत आणि छोटया राज्या इतका अर्थसंकल्प असलेली महापालिका, जीएसटी लागू झाल्यामुळे जकातीपोटी पालिकेला गेल्या आर्थिक वर्षामध्ये सात हजार कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळणार मोठे उत्पन्न बंद होणे, त्यामुळे पालिकेला नागरी सुविधा आणि आस्थापना खर्च भागविणाचा प्रश्न निर्माण होणे, जकात कर बंद झाला आणि त्यामागोमाग अने प्रश्न ऐरणीवर येणे, मुंबईची सुरक्षितता पूर्वी जकातीच्या निमित्ताने मुंबईच्या वेशीवर असलेल्या जकात नाक्यांवर मालवाहू वाहनांची तपासणी होत होती बंद झाल्याने व मालवाहू वाहनांची तपासणी थंडावल्याने वाहनांतून घातपात घडविण्याच दृष्टीने स्फोटकांचा साठा मुंबईमध्ये सहजरित्या आणू शकते त्यामुळे दहशतीचे वातावरण निर्माण होणे, जकात नाक्यावर काम करणा-या कर्मचा-यांच्या अस्थापनेचा प्रश्न निर्माण होणे, मुंबईसह वेशीवरील पाच मोठया आणि रेल्वे, मुंबई पोर्ट ट्रस्ट, विमानतळ आदी विविध ठिकाणी असलेल्या ६५ जकात नाक्यांच्या रिकामी झालेल्या जागेचा प्रश्न, जकात बंद झाल्याने राज्यातील पालिकेला निर्माण झालेला महसूलीचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया." | |

| | | |
|---|---|---|
| 16 | "मुंबई आणि उपनगरात जाणारा सर्व प्रकारचा माल यापूर्वी एपीएमसीच्या नियमनात असणे, मात्र सरकारने अनेक मालांवरील नियमन हटवून थेट पणनच्या अंतर्गत एपीएमसी मार्केटला डावलून सदरचा माल मुंबईत नेण्यास परवान देण्यात येणे, अशी परवानगी देत असतांना एपीएमसीची कोट्यावधी रुपयांची बाजार फी बंद करुन बाजार फीऐवजी व्यापा-यांकडून सेवा शुल्क वसूल करण्याचीही परवानगी एपीएमसीला देण्यात आलेली असणे, पणन महासंचालकांनी तसेच आदेशही प्रशासनाला दिलेले असणे मात्र सदर व्यापा-यांकडून मागील तीन वर्षापासूनचे शुल्क आकारण्यासाठी चालढकल केलेली असल्याने एपीएमसीचा सुमारे २०० कोटी रुपयांचा महसूल बुडालेला असल्याची गंभीर माहिती जुलै,२०१७ च्या दुस-या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, भाजीपाला आणि फळ मार्केटमध्ये अनधिकृत व्यापार सुरु असुन कोणताही परवाना नसलेले व्यापारी मार्केटमध्ये राजरोसपणे व्यापार करीत असणे, एपीएमसीमध्ये होणा-या मालांची आवक निम्यालाने लपवली जात असल्याने प्रशासनाला जोरदार आर्थिक फटका बसत असणे, एपीएमसीच्या पाचही मार्केटवर सध्या प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण राहिलेले नसल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्यामुळे एपीएमसीची आर्थिक | **सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | स्थिती हालाखीची झालेली असणे, पुढील काळात कर्मचा-यांचे वेतनही होणे त्रासदायक होणार असणे, येथील व्यापारी व प्रशासनातील सबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने सुरु असलेला प्रचंड आर्थिक गैरव्यवहार, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील कर्मचा-यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, एपीएमसीतील अनागोंदी कारभाराचा फटका कर्मचा-यांना सोसावा लागणार असतांना प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यास टाळाटाळ केली जात असल्याने त्यांचेमध्ये निर्माण झालेले चिंतेचे तथा हवालदिल वातावरण, कोट्यावधी रुपयांचा महसुल बुडत असतांनाही आवश्यक उपाययोजना केली जात नसणे, त्यामुळे पुढील काळात सदरचा प्रश्न अधिकच गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झालेली असतांनाही युध्दपातळीवर कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्यासाठी शासनाने याप्रकरणी वेळीच हस्तक्षेप करुन यासंदर्भात युध्दस्तरावर उपाययोजना करण्याची | |

| | | |
|---|---|---|
| | नितांत आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | |
| 17 | "महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक व केरळ या चार राज्यांमधुन जाणा-या मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेल ते पेण पर्यंतची स्थिती अत्यंत बिकट झालेली असणे, जागोजागी केलेल्या खोदकामांमुळे रोड अरुंद झालेला असून सकाळ संध्याकाळी मोठ्या प्रमाणात वाहतुककोंडी निर्माण होत असणे, सर्वच ठिकाणी मोठे खड्डे पडलेले असणे, पावसाचे पाणी साचल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नसून वाहने अक्षरश: आदळत असणे, खड्ड्यांमुळे वारंवार छोटे-मोठे अपघात होत असुन रोडवर अपघात होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी सूचना फलक लिहीण्यात आलेले नसणे, परावर्तक पट्ट्या, बोर्ड व इतर उपाययोजना केलेल्या नसल्याने महामार्गाला लागू असलेल्या गावांनाही याचा मोठा फटका बसलेला असणे, रोडलगतच्या नाल्यांमध्ये माती साचली असून वाहने अडकण्याची भिती निर्माण झालेली असणे, अहोरात्र काम चालु असलेल्या ठिकाणी सूचना फलक नसल्याने वाहनचालकांना त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, अपघात टाळण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत असतांना सुरक्षिततेविषयी उपाययोजना केलेल्या | **सार्वजनिक बांधकाम विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | नसल्याचे जुलै, २०१७ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आलेले असणे, आसपासच्या गावातील नागरीकांना ये-जा करण्यास अडथळा निर्माण झालेला असणे, त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, सदरची समस्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दि. १५ जुलै, २०१७ रोजी तसेच अलि कडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यास टाळाटाळ केली जात असल्याने त्यांचेमध्ये निर्माण झालेले चिंतेचे तथा हवालदिल वातावरण, या महामार्गावर सुरक्षिततेच्या उपाययोजना केलेल्या नसल्याने परिसरातील नागरीक व वाहनचालकांच्या जिवीताचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, सदर महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असतांनाही आवश्यक उपाययोजना केली जात नसणे, त्यामुळे पुढील काळात सदरचा प्रश्न अधिकच गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झालेली असतांनाही | |

| | | |
|---|---|---|
| | युध्दपातळीवर कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, शासनाने याप्रकरणी वेळीच हस्तक्षेप करुन यासंदर्भात युध्दस्तरावर उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | |
| 18 | "राज्यात, नागपूर-कोराडी वीज केंद्रातील, चार संचाच्या ऑनलाईन लिलावामध्ये, कोटयावधी रुपयाचा आर्थिक घोटाळा झाल्याचे निदर्शनास येणे, वीज केंद्रातील संचाची बाजार भावाची किंमत २५० कोटी असताना, महाजनकोचे तत्कालीन अध्यक्ष व संचालकांनी, ६०:६० कोटीत विक्री करुन, राज्य शासनाचे कोटयावधी रुपयाचे आर्थिक नुकसान करणे, मिनरल्स ॲण्ड स्टील ट्रेडींग कॉर्पोरेशनने, १०० कोटी मालमत्ता व उलाढालीची अट इतर कुठल्याही लिलावासाठी ठेवली नसताना, केवळ महाजनकोसाठी सदरहू कंपनीने ठेवल्यामुळे, निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यामुळे आधीच आर्थिकदृष्टया तोटयात असलेल्या महाजनकोचे, प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | **उद्योग, उर्जा व कामगार (उर्जा) विभाग** |
| 19 | "राज्यातील सरकारी व खासगी रुग्णालयात, मोती | **वैद्यकिय शिक्षण** |

| | | |
|---|---|---|
| | बिंदू शस्त्रक्रियेसाठी वापरल्या जाणा-या इन्ट्राओक्युलर लेन्सची मुळ किंमतीच्या २० पट जादा विक्री किंमत आकारुन रुग्णांची मोठया प्रमाणात आर्थिक लूट करण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार नुकताच निदर्शनास येणे, अन्न व औषध विभागाच्या गुप्तचर अधिका-यांनी तपासणी करुन दि.०८.०६.२०१७ रोजी, शासनास अहवाल सादर केलेल्या अहवालादवारे सदर गंभीर प्रकार उघड होणे, बलून आणि गाइडिंग कॅथेटर व तत्सम सामुग्री मुळ किंमती पेक्षा सुमारे ५५० टक्क्यापर्यंत जादा शुल्क आकारुन रुग्णांची प्रचंड प्रमाणात आर्थिक फसवणूक करणे, लेन्सची विक्री किंमत मुळात कमी असताना, मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर वापरलेल्या लेन्सच्या कमाल किरकोळ किंमतीचा लेबल लावण्यात येणे, लेन्सच्या माध्यमातून उत्पादक वितरक आणि पर्यायाने रुग्णालयाकडून होत असलेली आर्थिक लूट रोखण्यासाठी, शासनाने बलून आणि गाइडिंग कॅथेटर व इतर सामुग्रीचा अत्यावश्यक औषधांच्या राष्ट्रीय यादीत त्वरीत समावेश करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | **व औषधी द्रव्ये (औषधी द्रव्ये) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| 20 | "अमरावती येथील डॉ पंजाबराव देशमुख वैद्याकीय महाविद्यालय व रूग्णालय, ते दिनांक २८ मे २०१७ रोजी पूजा घरडे यांची मुलगी, शिल्पा हिरूळकर यांचा मुलगा, माधुरी कावरे यांचा मुलगा, आफरीन बानो अब्दुल राजीक यांचा मुलगा याप्रमाणे चार बालकांना नवजात शिशू बालक अतिदक्षता विभाग (न्यू नेटल इन्सेंटिव्ह केअर यूनिट) मध्ये दाखल करण्यात येणे, या रूग्णालयात एनआयसीयूची जबाबदारी सांभळणा-या डॉक्टरेने प्रिस्क्रिप्शनवर दिलेल्या कॅल्शियम ग्लुकोनेट च्या इंजक्यान ऐवजी परिचारीकेनी सर्व शिशुनां पोटॅशियम क्लोराईडचे इंजेक्शन दिल्यामुळे चारही बालकांचा झालेला मृत्यू, चारही बालकांचा एकाच वेळेस मृत्यू झाल्यामूळे रूग्णांच्या नातेवाईकांनी संबंधीतांवर तातडीने कारवाई करण्याची केलेली मागणी, तातडीने या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात आली असता चुकीच्या इंजेक्शनमूळे चारही बालकांचा मृत्यू झाल्याचे उघडकीस आल्यानंतर सुध्दा अद्यापही दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्यामूळे नागरिकांत पसरलेला असंतोष, चिडीची भावना या सर्व गंभीर प्रकरणाची उच्च स्तरीय अधिका-यांमार्फतीने चौकशी करून संबधित दोषी व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व | **वैद्यकीय शिक्षण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | प्रतिक्रिया." | |
| 21 | "उल्हासनगर, जि. ठाणे, येथील वालधुनी नदीमध्ये जिन्स तयार करणाऱ्या कारखान्यांनी विषारी द्रव्ये सोडल्याने विषारी वायु हवेत पसरुन सुभाष टेकडी, रामनगर,हिरघाट,ओटी सेक्शन,फस्ट गेट, सम्राट अशोक नगर, येथील शेकडो लोकांना वायुबाधा होऊन उलट्या, डोकेदुखी, मळमळ, इत्यादी त्रास होत असल्यामुळे नागरिकांनी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, जिन्स कपड्यांवर रासायनीक प्रकिया न करता विषारी सांडपाणी नदीत सोडले जाणे, तसेच उल्हासनगर गावातून वाहणाऱ्या वालधुनी नदी पात्रात शहरातील व पर राज्यातील विषारी रसायनांचे टँकर आणले जाऊन ती सोडले जात असल्याचे अनेक प्रकार यापूर्वी उघडकीस येणे, २८ नोव्हेंबर, २०१४ रोजी अशाचप्रकारे टँकरद्वारे विषारी केमिकल सोडल्याने ६०० नागरीकांना वायुबाधा होणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाने हे प्रकार टाळण्याकरता अनेक भंगार विक्रेते व जिन्स कारखान्यांना नोटीसा देऊन कारखाने सिल करुनही वालधुनी नदीत रासायनीक पाणी व रसायने सोडण्याच्या वारंवार घडत असलेल्या घटना, या विरोधात पोलिसांकडे पुराव्यासह माहिती देऊनही पोलिसांनी त्याकडे केलेले दुर्लक्ष, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व | **पर्यावरण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | प्रतिक्रिया." | |
| 22 | "सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यातील साडेसात लाख विद्यार्थ्यांना देण्यात येणारी ऑनलाईन शिष्यवृत्ती गत २ ते ३ महिने बंद पडल्याने विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे माहे जुलै,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, एकाच कंत्राटदाराला कोट्यावधी रुपयांचे काम गत पाच वर्षात देण्यात येणे, सदर कंपनीने गत पाच वर्षात कंत्राटापोटी १५० ते २०० कोटी रुपये शासनाकडून घेऊनही आवश्यक ती सेवा उपलब्ध करुन दिली नसतांनाही विभागाने कोणतीच दखल न घेणे, माहे एप्रिल मध्ये या कंपनीचा कालावधी संपल्यानंतर शासनाला पुढील कामकाज सुरळीतपणे चालविण्याकरता आवश्यक तो आयपी ॲड्रेस व सोर्स कोड देणे आवश्यक असतानाही हेतुत: करप्ट कोड कंपनीने दिल्याची या विभागातील अधिकाऱ्यांनी तक्रारी करुनही या कंपनी विरोधात पोलीसांकडे कोणतीही तक्रार वा एफआयआर दाखल करण्यात न आल्याने राज्यातील लाखो विद्यार्थी व त्यांच्या पालकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, कोट्यावधी रुपयांचे मानधन घेउन फसवणूक करणाऱ्या कंपनीवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | **सामाजिक न्याय विभाग** |
| 23 | "राज्यातील ठाणे, मुंबई, पुणे, इत्यादी भागात | **नगरविकास** |

| | | |
|---|---|---|
| | विशेषत: रेल्वे स्टेशन, रुग्णालये, मार्केट, देवस्थाने, प्रमुख रस्ते इत्यादी ठिकाणी अनधिकृत फेरीवाल्यांची वाढलेली संख्या, या फेरीवाल्यांवर कारवाई करताना ठाण्यातील वाघळे इस्टेट, डोंबिवली पुर्वेकडचा परिसर इत्यादी भागात अतिक्रमण विरोधी विभागाने कारवाई करताना फेरीवाल्यांनी म.न.पा. कर्मचारी व अधिकारी यांना मारहाण केल्याचे माहे जुलै २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, मुंबईतील फोर्ट व कुलाब्यातील एम.जी. रोडवर परवानाधारक ३९३ फेरीवाले असतांना प्रत्यक्षात ४५० ते ५०० फेरीवाल्यांनी त्या ठिकाणी सुरु केलेला व्यवसाय, तसेच कुलाब्यातील कॉजवे रोड, एस.व्हि.एस रोड, मारुती टेंपल फुटपाथ, कुलाबा पोलीस स्टेशन समोरील फुटपाथ, आर.बी.आय. न्यु बिल्डींग येथील फुटपाथ इत्यादी अनेक ठिकाणी प्रत्यक्षात ९० जणांना तात्पुरते व कायमस्वरुपी परवाना असतानाही त्या ठिकाणी शेकडो अनधिकृत विक्रेत्यांनी सुरु केलेली विक्री, त्याच प्रमाणे जिपीओ फोर्ट स्ट्रिट येथे १६ अधिकृत लायसन्स धारक तसेच सेंट जॉर्ज स्ट्रीट वरील ३९ अधिकृत परवाना धारक वगळता शेकडो अनधिकृत फेरीवाल्यांनी हे सर्व रहदारीचे रस्ते वापरुन सुरु केलेला गैरवापर, मुंबईतील मनपाच्या ए वॉर्डात बेकायदेशीर फेरवाले व स्टॉलवाल्यांचे प्रमाण वाढुनही म.न.पा. प्रशासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मनपातील तसेच कुलाबा पोलीस | **विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | स्टेशनमधील अधिकाऱ्यांना फेरीवाल्यांकडून दरमहा मिळणारा लाखो रुपयांचा हप्ता, यामुळे फेरीवाल्यांच्या बेकायदेशीर व्यवहाराकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, अतिक्रमण विरोधी पथकाला पुरेसे पोलीस संरक्षण मिळत नसल्याने भविष्यात बेकायदेशीर फेरीवाल्यांविरोधात कारवाई करण्याची निर्माण झालेली भिती, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया " | |
| 24 | "मुंबईला जोडणा-या पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे व मुलुंड दरम्यान रेल्वे रुळावर उभारण्यात आलेल्या पुलाच्या स्लॅबचे सिमेंट निखळलेले असून सदरचा पूल धोकादायक स्थितीत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, मुंबई आणि ठाणे शहरासह राज्यातील इतर भाग आणि गुजरात, मध्यप्रदेश व इतर परराज्यांना जोडणारा कोपरी पुल अत्यंत महत्वाचा असून वाहनसंख्येचा विचार केल्यास या परिसरात वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झालेली असणे, मुंबईहून येणारा व जाणारा पूर्व द्रुतगती महामार्ग ८ पदरी असतांना कोपरी पुल मात्र चारच पदरी असून या पुलावरुन दररोज किमान एक लाख वाहने ये-जा करत असुन पुलाच्या खालुन लाखो प्रवाशांना घेऊन हजारो रेल्वे लोकलची वाहतुक सुरु असणे, महाड येथील सावित्री नदीवरील पुल कोसळुन झालेल्या अपघाताचा विचार करता कोपरी येथील पूल रेल्वे रुळावर कोसळल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता | **सार्वजनिक बांधकाम विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | असतांना प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, सदर पुलाचे रुंदीकरण व पुनर्बांधणी तातडीने करण्याबाबत लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री यांचेकडे मागण्या, शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी लाखो वाहनचालकांबरोबरच नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, सदर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.” | |
| 25 | "पुण्याच्या विश्रांतवाडी येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासकीय वसतिगृहातील उपहार गृह दि.०१ जुलै, २०१७ पासून बंद असल्याने वसतिगृहातील ५०० विद्यार्थ्यांवर उपाशी राहण्याची आलेली वेळ, या उपहार गृहात मिळणारे निकृष्ट दर्जाचे जेवण, तसेच पिण्याच्या पाण्यात अळ्या आढळून आल्याने या दुषीत याबाबत विद्यार्थ्यांनी वसतीगृह व्यवस्थापनाकडे वारंवार तक्रारी करुनही त्याची दखल घेण्यात येत नसल्याने विद्याथ्र्यांनी ताटे वाजवून सुरु केलेले बेमुदत आंदोलन, शासनाने या सर्व प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग** |
| 26 | "म्हाडाच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निवृत्तीच्या पांच दिवस अगोदर झोपडपट्टी पुनर्वसनाची ४५० प्रकरणे निकालात काढल्याने निवृत्त कार्यकारी अधिकारी | **गृहनिर्माण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | यांच्या गतीमान कारभाराबाबत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, झोपडपट्टी पुनर्वसनातील पुनर्विकासाच्या कामात प्रती चौरस फूट १२५ रुपये इतका दर दिल्याशिवाय कुठलाही मुख्य कार्यकारी अधिकारी औपचारीकरित्या प्रकरण मान्य करीत नाही हा दर दिल्यानंतरच याप्रकरणातील विकासकांचे प्रस्ताव मान्य होतात,त्याच प्रमाणे याप्रकरणात सही करण्यासाठी प्राधिकरणाच्या उप अभियंता, सहाय्यक अभियंता, उप मुख्य अभियंता, मुख्य अभियंता ते विशेष कार्यअधिकारी, मुख्य अधिकारी यांचे प्रत्येक टप्प्यावर मंजूरीसाठी विकासकांकडून घेण्यात येणारे वेगवेगळे दर, सदर प्राधिकरणाच्या ४५० मंजूर करण्यात असलेल्या प्रकरणाची शासनाने तात्काळ पारदर्शक चौकशी करुन भ्रष्टाचारी, जबाबदार अधिका-यांविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता वा याबाबत शासनाची ठोस भूमिका." | |